Journal of East-West Thought
ISSN: 2168-2259 (online)
(https://jetjournal.us/)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1

JOURNAL OF EAST-WEST THOUGHT

Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

# भारतीय स्वातंत्र्यलढयातील कर्तृत्ववान महिला - एक अभ्यास

**प्रा. डॉ. दिनेश दयाराम माळी,** विभाग प्रमुख, संरक्षण व सामरिक शास्त्र विभाग, कै. श्रीमती विमलबाई उत्तमराव पाटील कला आणि कै. डॉ. बी. एस.देसले विज्ञान महाविद्यालय, साक्री, ता. साक्री, जि. धुळे

## प्रस्तावना

भारतीय स्वातंत्र्यलढयामध्ये अनेकांनी आपले योगदान तर काहींनी बलिदान दिले आहे हे आपण ऐकतो आणि वाचतोही यामधुन आपल्याला प्रेरणाही मिळते. परंतु तत्कालिन परिस्थितीमध्ये काही महिला अशाही होत्या की, ज्यांनी स्वातंत्र्यलढयात स्वतःला झोकुन दिले. शौर्य, साहस, संघटन कौशल्य आणि निस्सिम देशप्रेमापोटी स्वातंत्र्यलढ्यात कार्य केले यामध्ये पुरुषापेक्षा तसुभरही महिलांचे कार्य कमी नाही. अगदी आम्ही पुरुषापेक्षा कुठेच कमी नाहीत हे महिलांनी स्वतःच्या कार्यातुन सिध्द केले. दि. १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले, स्वातंत्र्यानंतर भारतीय नागरीक मुक्त श्वास घेऊ लागला. प्रत्येकाच्या मनामध्ये देशप्रेम, राष्ट्रविकास, समाजविकासाची स्वप्न रंगू लागली. काहीजन ती प्रत्यक्षात कृतीत आणण्यासाठी नियोजनबद्ध आराखडाही करु लागली.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यापासून आपण स्वाभिमानाने आणि ताठमानेने म्हणतो, आम्ही स्वतंत्र भारताचे स्वतंत्र नागरिक आहोत परंतु या स्वातंत्र्यलढ्यात अनेकांनी आपले योगदान आणि काहीनी बलिदान दिले आहे. त्यांच्या योगदानामुळेच भारताला स्वातंत्र्य मिळाले आहे. याबरोबरच सत्याग्रह, असहकार, इंग्रजांना विरोध, विदेशी मालावर बहिष्कार असे अनेक विविध उपाय त्यावेळेस सामान्य जनतेनेही केले आहेत. सामान्य जनताही यामध्ये मागे नव्हती असेच म्हणावे लागते. लहानांपासुन मोठ्यांपर्यंत प्रत्येकजण स्वातंत्र्य मिळविण्यासाठी तळमळत होता. भारतीय स्वातंत्र्य लढयात महिला मागे नव्हत्या. त्यांनी देखील स्वतःला स्वातंत्र्यलढयात झोकून दिले होते. स्वातंत्र्यलढयातील या महिलांचे योगदान कौतुकास्पद, अभिमानास्पद आणि वाखणण्याजोगे आहे. या महिलांनी पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून लढा दिला. अशा महिला स्वातंत्र्यसेनानींच्या कार्याला उजाळा मिळणे आवश्यक आहे.

## मुख्य संबोध

योगदान, स्वातंत्र्य लढा, शौर्य, साहस, संघटन कौशल्य, निस्सिम देशप्रेम, देशप्रेम, राष्ट्रविकास, नियोजनबद्ध आराखडा, स्वाभिमान, बलिदान, सत्याग्रह, असहकार, बहिष्कार, अभिमान.

## विषय प्रवेश

दि. १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वातंत्र झाला. भारतीय स्वातंत्र्यलढयात अनेकानी बलिदान दिले, अनेकांनी आपले योगदान दिले. या स्वातंत्र्यलढ्यात सहभागी असणाऱ्याऱ्यांमध्ये महिलांचाही समावेश होता या महिला स्वातंत्र्यसेनानींची माहिती व्हावी, त्यांचे कार्यकर्तृत्व याची माहिती व्हावी, प्रेरणा मिळावी याअनुषंगाने सदरील विषयाची शोध निबंधासाठी निवड करण्यात आली आहे.

भारतीय स्वातंत्र्यलढयात केवळ सहभागच नव्हे तर पुरुषांच्या खांदयाला खांदा लावुन काम करणाऱ्या आणि स्वतःचे सर्वस्वपणाला लावणाऱ्या महिलांचे कार्यकर्तृत्व पाहिले तर खरोखरच आपण आज स्वातंत्र्यानंतरच्या स्वतंत्र भारतात वावरत आहोत, जगत आहोत पण आपले कार्य कर्तृत्व राष्ट्रासाठी काय आहे? हा प्रश्न नक्कीच पडल्याशिवाय रहात नाही. एवढे अतुलनीय, निर्भिड, निःस्वार्थी केवळ देश आणि


Copyright © | JET Network, All Rights Reserved

देशप्रेमापोटी या महिलांनी कार्य केले. त्यामध्ये प्रामुख्याने खालील महिलांचे कार्य कर्तृत्व याचा आढावा घेण्यात सुधारणा करण्यासाठीची चळवळही सुरु झाली होते अनेक समाजसुधारक यासाठी पुढे सरसावत होते कारण सुधारणा होणेही निकडीचेच काम होते. यामध्ये समाजसुधारक असणाऱ्या कमलादेवी चटोपाध्याय यांनी स्वतःला याकामी झोकून दिले. केवळ समाजसुधारक म्हणून समाज सुधारणेच्या कामातच नव्हे तर स्वातंत्र्यलढयासाठी आपले योगदान दिले. ब्रिटीशांनी अटक केलेल्या पहिल्या महिला म्हणजे कमलादेवी चटोपाध्याय या होत. कमला देवांनी महात्मा गांधीजीच्या १९३० च्या मिठाच्या सत्याग्रहातही भाग घेतला होत शिवाय स्त्रियांचा सामाजिक आणि आर्थिक स्तर सुधारावा यासाठी त्यांनी काम केले. एवढेच नव्हे तर स्त्रियांना स्वावलंबी बनविण्यासाठी त्यांनी अनक लघुउद्योग सुरु केले. अबला महिलांना सबला बनविण्यासाठी त्या सतत धडपड करत होत्या.

भारतीय स्वातंत्र्यलढ्यात अनेक महिलांनी आपल्या साहस, त्याग आणि नेतृत्वाने महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्यापैकी काही कर्तृत्ववान महिलांची ओळख खालीलप्रमाणे:

१८५७ च्या स्वातंत्र्य संग्रामात झाशीच्या राणी लक्ष्मीबाई यांनी ब्रिटिशांविरुद्ध शौर्याने लढा दिला. त्यांचे धैर्य आणि बलिदान भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील प्रेरणादायी उदाहरण आहे.

'बेगम हजरत महल' हे भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील एक महत्वाचे नाव आहे. १८५७ च्या बंडात त्यांनी मोठा पराक्रम गाजवला. कारण १८५७ च्या युध्दात त्यांनी या युध्दाचे नेतृत्व स्वतः केले. मात्र इंग्रजांच्या बलाढ्य शक्तीसमोर त्यांना हार पत्करावी लागली. त्यांना त्यांचा महाल पण सोडावा लागला पण पराभव झाला म्हणून त्या शांत राहिल्या नाहीत. सतत इंग्रजांना शह देण्याचा त्या प्रयत्न करत होत्या. त्यांनी इंग्रजांना भारतातून हाकलून लावण्यासाठी शेवटपर्यंत प्रयत्न केला. पण इंग्रजांची भली मोठी फौज, अफाट दारुगोळा यामुळे त्यांना त्यांच्या विरोधात लढता आले नाही पण त्यांनी ज्याप्रकारे इंग्रजी सैन्यास वेठीस आणले होते ते खुपच कौतुकास्पद आहे. कारण बेगम हजरत महल भारतातील पहिली मुस्लिम महिला होती. जिने आपल्या धर्माचा पडदा दूर सारत इंग्रजाविरोधात बंड पुकारले. आपल्या राज्याची आणि देशाची आण, बान आणि शान राखली. बेगम हजरत महलने तलवारीच्या टोकावर आपल्या अद्‌भूत संघटन कौशल्याने इंग्रजाचे मनसुबे हानुन पाडले व भारताचा गौरव वाढविला. स्वाभिमानी बेगम हजरत महलच्या देशभक्ती, साहस आणि शौर्य यामुळे त्यांचे नाव इतिहासांच्या पानांमध्ये सुवर्णाक्षरांनी कोरले गेले आहे.[१]

कॅप्टन लक्ष्मी सहगल यांचे कार्याचा आढावा घेतांना प्रामुख्याने ही बाब प्रकषनि जाणवते ती म्हणजे महिला कुठेच पुरुषपिक्षा कमी नाहीत जे काम पुरुष करतात ते काम महिलाही करु शकतात. हे त्यानी त्यांच्या कार्यकर्तृत्वातून सिद्ध करुन दाखवले. नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी ज्या आझाद हिंद सेनेची स्थापना केली. त्यातील स्त्रियांच्या तुकडीचे नेतृत्व कॅप्टन लक्ष्मी सहगल यांनी केले होते. आझाद हिंद सेनेबरोवर काम करण्यासाठी त्यांनी स्वतःला झोकून दिले होते.[२] त्यामुळे आझाद हिंद सेनेबरोबर काम करतांना त्यांनी हेच आपल्या कार्यकर्तृत्वातून दाखवून दिले की, अहिंसेच्या मागनि होणारे आंदोलन असो किवा लढाई करण्याची वेळ येवो. महिला कुठेच मागे नाही त्या सर्वच बाबतीत तेवढ्याच सक्षम आणि निर्भिड आहेत जेवढे की पुरुष आहेत.

कॅप्टन लक्ष्मी सहगल यांचे कार्य महिलांसाठी प्रेरणादायी आणि कौतुकास्पद, अभिमानास्पद असे आहे. आझाद हिंद सेनेत जाण्यापुर्वी कॅप्टन लक्ष्मी सहगल यांनी दुसऱ्या महायुध्दात सहभाग घेतला होता.


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
*(https://jetjournal.us/)*
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

त्यासाठी त्यांना ब्रम्हदेशात तुरुंगवासही भोगावा लागला आला आहे. कॅप्टन लक्ष्मी सहगल हे खरोखरच निर्भिड व्यक्तिमत्व होतं हे त्यांच्या कार्यावरुन सिध्द होते.

भारतीय स्वातंत्र्यलढ्यात भारतीय महिलांनी योगदान दिले हे आपण पाहतो पण एक नाव असे आहे की, ज्या भारतीय नसून देखील त्यांनी भारतीय स्वातंत्र्यलढयात आपले योगदान दिलेले आहे आणि ते नाव म्हणजे ॲनी बेझंट होय. कारण भारतीय नसलेल्या पण आयरिश असून देखील ॲनी बेझंट यांनी भारतीय स्वातंत्र्यलढ्यात मोठे योगदान दिले आहे.[३] सन १९१५ मध्ये त्यांनी होमरुल चळवळही चालू केली. एवढेच नाही तर त्या राष्ट्रीय कांग्रिसच्या सदस्य बनल्या आणि त्यांनी ब्रिटीशांविरुध्द आवाज उठवायला सुरुवात केली. त्या काँग्रेसच्या पहिल्या महिला अध्यक्ष बनल्या. त्यांनी न्यू इंडिया नावाचे वृत्तपत्र देखील चालविले. शैक्षणिक क्षेत्रातही त्यांचे महत्वपूर्ण योगदान आहे. कारण त्यांनी अनेक शाळा-महाविद्यालये चालू करण्यास मदत केली. ॲनी बेझंट यांच्या कार्यावरुन त्या भारतीव वंशाच्या नव्हत्या. परंतु भारतीय जनता आणि भारताविषयीचे प्रेम याची प्रचिती येते.

१९४२ च्या 'भारत छोडो' आंदोलनात अरुणा आसफ अली यांनी मुंबईतील गोवालिया टँक मैदानात भारतीय ध्वज फडकावला, ज्यामुळे त्या आंदोलनाचे प्रतीक बनल्या. त्यांच्या या धाडसामुळे त्यांना 'भारताची ग्रँड ओल्ड लेडी' म्हणून ओळखले जाते.

भारतीय स्वातंत्र्यलढयामध्ये ज्यांनी सहभाग घेतला, योगदान दिले. यामध्ये अरुणा असफअली हे देखील एक मोठे नाव समोर आल्याशिवाय रहात नाही. भारत छोडो आंदोलनात त्यांचा महत्वपूर्ण सहभाग होता. कारण भारत छोडो आंदोलनाच्या वेळेत त्यांनी मुंबईत झालेल्या आंदोलनात भारताचा ध्वज हातात घेऊन आंदोलनाचे नेतृत्व केले होते याचे परिणाम त्यांना भोगावे लागले होते. कारण भारत छोडो आंदोलनात सहभाग घेतला, ब्रिटिशांविरुध्द आवाज उठवला म्हणून त्यांना तुरुंगवासही भोगावा लागला.[४] परंतु तुरुंगवास भोगतांनाही त्या शांत बसल्या नाहीत. तुरुंगवास भोगतांना तुरुंगात असतांना कैदयांना देण्यात येणारी जी वाईट वागणूक होती ही त्यांना अन्यायकारक वाटली. त्यामुळे त्यांनी तुरुंगात असतांना कैद्यांना देण्यात येणाऱ्या वाईट वागणूकीबद्दल तुरुंगात देखील आंदोलन केले होते. त्यांच्या या कार्यावरुन त्यांचे निस्सिम देशप्रेम आणि निर्भिड व्यक्तिमत्व याची प्रचिती आल्याशिवाय रहात नाही.

'नाइटिंगेल ऑफ इंडिया' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सरोजिनी नायडू यांनी भारतीय स्वातंत्र्य चळवळीत सक्रिय सहभाग घेतला. त्या भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसच्या पहिल्या महिला अध्यक्ष होत्या आणि स्वातंत्र्यानंतर उत्तर प्रदेशच्या पहिल्या महिला राज्यपाल बनल्या.

भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील एक थोर कार्यकर्त्या, प्रभावी, वक्त्या, कवयित्री म्हणून सरोजिनी नायडू यांची ओळख आहे. सरोजिनी नायडू यांनी श्रमप्रतिष्ठा, स्वी स्वातंत्र्य आणि राष्ट्रवाद यांचा पुरस्कार केला होता. सरोजिनी नायडूंनी महात्मा गांधींचे नेतृत्व पूर्णतः स्विकारले, रौलट कायदा, मॉंटेग्यू-चेम्सफर्ड सुधारणा, खिलापत चळवळ अशा विविध चळवळीत त्यांनी कॉंग्रेसच्या ध्येयधोरणानुसार प्रचार आणि प्रसार केला, मोहिमा काढल्या आणि महात्मा गांधीजींच्या असहकार चळवळीत हिरीरीने सहभाग घेतला.[५] सरोजिनींनी हिंदू-मुस्लिम ऐक्य, स्त्रियांचे पुरुषांच्या बरोबरीने काम करण्याचे हक्क आणि स्वातंत्र्य हेच आपले जीवन कार्य मानले. थोडक्यात महात्मा गांधीजीचे विचार ऐकून त्या गाधीवादी झाल्या. त्यांच्याबरोबर प्रत्येक आंदोलनात सरोजिनी नायडू यांनी सहभाग घेतला.


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
(https://jetjournal.us/)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 1
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या पत्नी कमला नेहरू यांनी स्वातंत्र्य चळवळीत सक्रिय सहभाग घेतला. त्यांनी महिलांना स्वातंत्र्य आंदोलनात सहभागी होण्यासाठी प्रेरित केले आणि विविध आंदोलनांमध्ये भाग घेतला. महात्मा गांधी यांच्या पत्नी कस्तुरबा गांधी यांनी स्वातंत्र्य चळवळीत महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. त्यांनी सत्याग्रह आणि असहकार आंदोलनात सहभाग घेतला आणि महिलांना सामाजिक सुधारणांसाठी प्रेरित केले. उषा मेहता यांनी १९४२ च्या 'भारत छोडो' आंदोलनादरम्यान गुप्त रेडिओ स्टेशन चालवून ब्रिटिशांविरुद्ध प्रचार केला. त्यांच्या या कार्यामुळे त्यांना अटक झाली, परंतु त्यांचे योगदान महत्त्वपूर्ण ठरले. जवाहरलाल नेहरू यांच्या बहिण विजयालक्ष्मी पंडित यांनी स्वातंत्र्य चळवळीत सक्रिय सहभाग घेतला. स्वातंत्र्यानंतर त्या संयुक्त राष्ट्रांच्या महासभेच्या पहिल्या महिला अध्यक्ष बनल्या.

भीकाजी कामा या भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील एक प्रमुख क्रांतिकारक होत्या. त्यांनी परदेशात राहून भारतीय स्वातंत्र्याच्या चळवळीला पाठिंबा दिला. १९०७ मध्ये त्यांनी जर्मनीत भारतीय ध्वज फडकावला, जो भारतीय स्वातंत्र्याचे प्रतीक मानला जातो. त्यांना "भारतीय क्रांतीची जननी" म्हणून ओळखले जाते. कमलादेवी चट्टोपाध्याय या एक समाजसुधारक, नाटककार आणि स्वातंत्र्यसैनिक होत्या. त्यांनी भारतीय स्वातंत्र्यलढ्यात सक्रिय भाग घेतला आणि महिला उत्थानाच्या क्षेत्रातही महत्त्वपूर्ण काम केले. त्यांनी भारतीय हस्तकला आणि हथमाग उद्योगाच्या पुनरुज्जीवनातही महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

अन्नपूर्णा महाराणा या ओडिशा राज्यातील एक स्वातंत्र्यसैनिक होत्या. त्यांनी ब्रिटिश सरकारविरुद्ध लढा दिला आणि ग्रामीण भागातील महिलांना स्वातंत्र्यलढ्यात सामील होण्यासाठी प्रेरित केले. त्यांच्या समर्पणामुळे त्या ओडिशा राज्यातील एक प्रमुख व्यक्तिमत्त्व बनल्या. मातंगिनी हजारा या बंगाल राज्यातील एक स्वातंत्र्यसैनिक होत्या. त्यांनी १९४२ च्या भारत छोडो आंदोलनात सक्रिय भाग घेतला. ब्रिटिश सैन्याने त्यांना गोळ्या घालून ठार मारले, परंतु त्यांचे बलिदान भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील एक प्रेरणादायी घटना मानली जाते. सुचेता कृपलानी या एक स्वातंत्र्यसैनिक आणि राजकीय नेत्री होत्या. त्यांनी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या अनेक चळवळींमध्ये सक्रिय भाग घेतला. स्वातंत्र्यानंतर त्या उत्तर प्रदेश राज्याच्या मुख्यमंत्री म्हणून निवडल्या गेल्या आणि त्या पदावर नियुक्त होणाऱ्या पहिल्या महिला होत्या.

भारतीय स्वातंत्र्यलढ्यात सहभागी झालेल्या महिलांचे कार्य अतुलनीय आहे.[६] या महिलांनी आपल्या साहस, त्याग आणि नेतृत्वाने भारतीय स्वातंत्र्यलढ्यात अमूल्य योगदान दिले, ज्यामुळे त्यांचे नाव इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिले गेले आहे.

**निष्कर्ष**

भारतीय स्वातंत्र्यलढयात सहभागी होऊन कार्य करणाऱ्या महिलांची कामगिरी अभिमानास्मद, अतुलनीय आणि प्रेरणादायी आहे. भारतीय स्वातंत्र्यलढ्यात महिला स्वातंत्र्यसेनानींनी पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम केले. स्वातंत्र्यलढ्यातील महिलांमध्ये निस्सिम देशप्रेम, निर्भिड वृत्ती असल्याचे समोर आले. स्वातंत्र्यापूर्वी भारतीय स्वातंत्र्यासाठी महिला अनेक चळवळीत सहभागी झाल्या, प्रत्यक्ष लढल्या, तुरुगात गेल्या ज्यामुळे आपल्याला स्वातंत्र्य मिळाले. परंतु स्वातंत्र्यानंतर स्वतंत्र भारताचे नागरिक म्हणून आपण काय करतो, काय केले पाहिजे याचा सारासार विचार करुन प्रत्येकाने देशासाठी, देशाच्या विकासासाठी आपले योगदान कोणत्या ना कोणत्या पध्दतीने, स्वरुपातून दिले पाहिजे. इतरांनाही यासाठी प्रोत्साहित केले पाहिजे.

भारतीय स्वातंत्र्यलढयामध्ये अनेकांनी आपले योगदान तर काहींनी बलिदान दिले आहे हे आपण ऐकतो आणि वाचतोही यामधुन आपल्याला प्रेरणाही मिळते. परंतु तत्कालिन परिस्थितीमध्ये काही महिला


Copyright © | JET Network, All Rights Reserved

अशाही होत्या की, ज्यांनी स्वातंत्र्यलढयात स्वतःला झोकुन दिले. शौर्य, साहस, संघटन कौशल्य आणि निस्सिम देशप्रेमापोटी स्वातंत्र्यलढ्यात कार्य केले यामध्ये पुरुषापेक्षा तसुभरही महिलांचे कार्य कमी नाही. अगदी आम्ही पुरुषापेक्षा कुठेच कमी नाहीत हे महिलांनी स्वतःच्या कार्यातुन सिध्द केले. खरोखरच भारतीय स्वातंत्र्यलढ्यात महिलांनी केलेले कार्य अतुलनीय आणि महिलांना अभिमान वाटावा आणि स्त्री-पुरुष दोघांनाही प्रेरणा मिळावी असेच आहे. त्यांच्या कार्यावरुन त्याचे देशप्रेम आणि निर्भिड वृत्तीची प्रचिती येते. एवढेच नाही तर आपण स्वतंत्र भारतात वावरत आहोत. परतु आपण देशासाठी कितपत योगदान देतो? हा प्रश्नही नक्की मनात घर करतो.

भारतीय स्वातंत्र्यलढ्यात सहभागी झालेल्या महिलांचे कार्य अतुलनीय आहे.[६] या महिलांनी आपल्या साहस, त्याग आणि नेतृत्वाने भारतीय स्वातंत्र्यलढ्यात अमूल्य योगदान दिले, ज्यामुळे त्यांचे नाव इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिले गेले आहे. भारतीय स्वातंत्र्यलढ्यात योगदान देणाऱ्या महिला भगिनींच्या कार्याची नोंद इतिहासात सुवर्ण अक्षरांनी कोरली गेली आहे.

**संदर्भसूची**

१. पाटील पद्मजा, जाधव शोभना, भारतीय इतिहासातील स्त्रिया, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २०११, पृ. क्र. २६३
२. स्वामी एन व्ही महाराष्ट्रातील समाजसुधारक, संत, साहित्यिक आणि थोर भारतीय विचारवंत विद्याभारती प्रकाशन, लातूर-२००५, पृ. क्र. ४५
३. पाटील दिपक, आशययुक्त अध्यापन पद्धती, अथर्व प्रकाशन, जळगाव, २०१५ पृ. क्र. १५८.
४. स्वामी एन. व्ही महाराष्ट्रातील समाजसुधारक, संत, साहित्यिक आणि थोर भारतीय विचारवंत विद्याभारती प्रकाशन, लातूर-२००५, पृ. क्र. १९
५. www.indianwomens.co.in
६. www.independenceday.com


Copyright © | JET Network, All Rights Reserved